लोकमत

# क्विक Update

## के.के. वाघ महाविद्यालयात उद्या मार्गदर्शन, चर्चासत्र

नाशिक : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्यावतीने अभियांत्रिकी व कृषी क्षेत्रातील करिअरच्या संधी, नियम व प्रवेश प्रक्रिया या विषयावर शनिवारी (दि. १९) सायंकाळी ५:३० वाजता रावसाहेब थोरात सभागृह येथे मार्गदर्शन व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. अभियांत्रिकी व कृषी क्षेत्रातील करिअरच्या संधी, नियम व प्रवेश प्रक्रिया याबाबत अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. जी. बी. दाभाडे मार्गदर्शन करणार आहेत. पालक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी केले आहे.

Hello Nashik
Page No. 5 Jul 18, 2025
Powered by: erelego.com